॥ ५९८१ ॥ डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ॥ १ ॥ तरी ते नव्हती संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ॥ २ ॥ मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नानापरी ॥३॥ तुका म्हणे मैंद । नाहीं त्यापासीं गोविंद॥४॥

॥५९८२ ॥ कलियुगीं कवित्व करिती पाषांड । कुशळ हे भांड बहु झाले ॥ १ ॥ द्रव्य दारा चित्तीं प्रजांचीं आवडी । मुखें बडबडी कोरडा-ची ॥ २ ॥ दंभ करी सोंग मानावया जग । मुखें बोले त्याग मनीं नाहीं ॥ ३ ॥ वेदाज्ञे करोनि न करिती स्वहित । नव्हती अलिप्त देहाहुनी ॥ ४ ॥ तुका म्हणे दंड साहील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसें ॥ ५ ॥

॥ ५९८३ ॥ नावडे तरि कां येतील हे भांड । घेउनिया तोंड काळें येथें ॥ १ ॥ नासोनियां जाय रस या संगती । खळाचे पंगती नारायणा ॥२॥ तोंडावाटा नर्क काढी अमंगळ । मिष्टान्ना विटाळ करी सुनें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं संताची मर्यादा । निंदे तोचि निंदा मायझवा ॥ ४ ॥

॥ ५९८४ ॥ उचित न कळे इंद्रियाचे ओढी । मुख बडबडी शिकलें तें ॥ १ ॥ आपण जाऊन न्यावीं नरकास । बळें बेताळीस कुळें जग ॥ २॥ अबोलणें बोले डोळे झांकुनियां । बडबडी वांयां दंभासाठीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आह्मी तेथील पारखी । नाचे देखोदेखीं जाणों खरें ॥ ४ ॥

॥ ५९८५ ॥ जळो प्रेमा तैसा रंग । जाय उडोनि पतंग ॥ १ ॥ सासू-साठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥ २ ॥ मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥ ३ ॥ जैसी वृंदावनकांती । उत्तम धरूं नये हातीं ॥ ४ ॥ बक ध्यान धरी । सोंग करूनी मासे मारी ॥ ५ ॥ तुका ह्मणे सर्प डुले । तैसा कथे माजी खुले ॥ ६ ॥

॥ ५९८६ ॥ साधक झाले कळीं । गुरु गुडीची लांब नळी ॥ १ ॥ पचीं पडे मद्यपान । भांग भूर्का हें साधन ॥ २ ॥ अभेदाचें पाठांतर । अति विषयीं पडिभर ॥ ३ ॥ चेल्याचा सुकाळ । पिंड दंड भंगपाळ ॥ ४ ॥ सेवा मानधन । बरे इच्छेनें संपन्न । सोंगाच्या नरकाडी । तुका ह्मणे बो-डोनियां सोडी ॥ ६ ॥

॥ ५९८७ ॥ एक करिती गुरु गुरु । भोंवता भारु शिष्यांचा ॥ १ ॥ पुंस नाहीं पाय चारी । मनुष्य परी कुतरीं तीं ॥ २ ॥ परस्त्री म-द्यपान । पेंडखान माजविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे निर्भर चित्तीं । अधोगती जावया ॥ ४ ॥

॥ ५९८८ ॥ आवडीच्या मतें करिती भजन । भोग नारायणें ह्मणती केला ॥ १ ॥ अवघा देव ह्मणे वेगळें तें काय । अर्थामाठीं डोय फोडूं पाहे ॥ २ ॥ लाजे कमंडल धरितां भोपळा । आणीक धीगळा प्रावरणा ॥ २ ॥ शाला गडवे धातुद्रव्यइच्छा चित्तीं । नैश्वर्य बोलती अवघें मुखें ॥ ३ ॥ तुका म्हणे यांस देवा नाहीं भेटी । ऐसे कल्पकोटि जन्म घेतां ॥ ४॥

॥ ५९८९ ॥ कवीश्वरांचा तो आह्मांसी विटाळ । प्रसाद बोंगळ चिव-डिती ॥ १ ॥ दंभाचे आवडी बहिराट अंधळे । सेवटासि काळें होईल तोंड ॥ २ ॥ सोन्यासेजारीं तों लाखेची जतन। संतत तें गुण जैसेतैसे ॥ ३ ॥ सेव्यसेवकता न पडतां ठावी । तुका ह्मणे गोवी पावती हीं ॥ ४ ॥

॥ ५९९० ॥ निंदा स्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभा-ट ॥ १ ॥ जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ॥ २ ॥ शृंगारिलें मढें । जीवेंवीण जैसें कुडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे रागें । भलतें चावळे वा-उगें ॥ ४ ॥

॥ ५९९१ ॥ कोरड्या गोष्टी चटक्या बोल । शिकल्या सांगे नाहीं ओल ॥ १ ॥ कोण यांचें मना आणी । ऐकों कानीं नाइकोनि ॥ २ ॥ घरोघरीं सांगती ज्ञान । भूस सिणें कांडिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे आपुल्या मति । काय रितीं पोकळें ॥ ४ ॥

॥ ५९९२ ॥ पशु ऐसे होती ज्ञानी । चर्वणीं या विषयांचे ॥१॥ ठेवूनियां लोभी लोभ । झाला क्षोभ आतमत्रीं ॥ २ ॥ केला आणिकां वाढी पाक । खाणें ताक मूर्खासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोठा घात । वाताहात हा देह ॥४॥

॥ ५९९३ ॥ कानीं धरीबोल बहुतांचीं मतें । चाट त्या परतें आणि-क नाहीं ॥ १ ॥ पावेल गौरव वोढाळाचे परी । दंड पाठीवरी यम-दूतां ॥ २ ॥ शब्दज्ञानी एक आपुलाल्या मतें । सांगती वेदांत भिन्नभा-वें ॥ ३ ॥ तुका ह्मणे एक भाव न धरिती । पडली हे माती त्यांचे तोंडीं ॥ ४ ॥

॥ ५९९४ ॥ घरोघरीं बहु झाले कवि । नेणे प्रसादाची चवी ॥ १ ॥ लंडा भूषणांची चाड । पुढें न विचारी नाड ॥ २ ॥ काढावें आइतें । तेंचि जोडावें स्वहितें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे । परि होताती अंधळे ॥ ४ ॥

॥ ५९९५ ॥ कथा करोनियां द्रव्य घेती देती । तयां अधोगति न-रकवास ॥ १ ॥ रवरव कुंभपाक भोगिती यातना । नये नारायणा करुणा

त्यांची ॥ २ ॥ असिखड्गधारा छेदिती सर्वांग । तप्तभूमी अंग लोळविती ॥ ३॥ तुका ह्मणे तया नरक न चुकती । सांपडले हातीं यमाचिया ॥ ४ ॥

॥ ५९९६ ॥ तक्र शिष्या मान । दुग्धा ह्मणे नारायण ॥ १ ॥ ऐशीं ज्ञानाचीं डोबडें । आशाविटंबिलीं मूढें ॥ २ ॥ उपदेश तो जगा । आपण सोंवळा इतका मांगा ॥ ३ ॥ रसनाशिश्नाचे अंकीत । तुका ह्मणे वरदळ स्फीत ॥ ४ ॥

॥ ५९९७ ॥ जैसें दावी तैसा राहे । तरि कां देव दुरी आहे ॥ १ ॥ दुःख पावायाचें मूळ । रहणी ठाव नाहीं ताळ ॥ २ ॥ माळामुद्रांवरी । कैचा सोंगें जोडे हरि ॥ ३ ॥ तुका ह्मणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ॥ ४ ॥

॥ ५९९८ ॥ जातीचें तें चढे प्रेम । पक्षी स्मरे राम राम ॥ १ ॥ ते काय गुण लागती येरां । कागा पिंजरा शोभेना ॥ २ ॥ शिकविलें तें सुजात सोसी । मग तयासी मोल चढे ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेषधारी । हिजड्या नारी नव्हेति ॥ ४ ॥

॥ ५९९९ ॥ भैंद आला पंढरीस । हातीं घेउनि प्रेमपाश ॥ १ ॥ पुढें नाडियलें जग । नेतो लागों नेदी माग ॥ २ ॥ उभारानी बाहे । दृष्टादृष्टी वेधीताहे ॥ ३ ॥ वैकुंठीहुनि पेणें । केलें पंढरीकारणें ॥ ४ ॥ पुंडलिकें थारा । देउनि आणिलें या चोरा ॥ ५ ॥ तुका ह्मणे चला । तुह्मी आह्मी धरूं त्याला ॥ ६ ॥

॥ ६००० ॥ बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग । नाहीं झाला त्याग अंतरींचा ॥ १ ॥ ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा । मनासी हा ठावा समाचार ॥ २ ॥ जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं । जातों विसरुनि सकळ हें ॥ ४ ॥ प्रपंचाबाहेरि नाहीं आलें चित्त । केले करी नित्य वेवसाय ॥ ४ ॥ तुका म्हणे मज भोरप्याचि परी । झालें सोंग वरी आंत तैसें ॥ ५ ॥

॥ ६००१ ॥ बसोनि थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ॥ १ ॥ नाहीं देखिला ना ठावा । तोंड पिटी करी हांवा ॥ २ ॥ फुगतें काउळें । म्हणे मी राजहंसा आगळें ॥ ३ ॥ गजाहूनि खर । म्हणे चांगला मी फार ॥ ४ ॥ मुलाम्याचें नाणें । तुका म्हणे नव्हे सोनें ॥ ५ ॥

॥ ६००२ ॥ दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥ १ ॥ तैसें खळां मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥ २ ॥ काय करावीं तीं बत्तीस लक्षणें । नाक नाहीं तेणें वांयां गेलीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैसी संवसर्गें ॥ ४ ॥

॥ ६००३ ॥ भाव नाहीं काय मुद्रा वाणी । बैसे बगळा निश्चळ ध्यानीं ॥ १ ॥ न मनी नाम न मनी त्यासी । वाचाळ शब्द पिटी भासी ॥ २ ॥ नाहीं चाड देवाची कांहीं । छळणें टोंके तस्करघाई ॥ ३ ॥ तुका ह्मणे साचा संग । नको शब्द स्पर्शअंग ॥ ४ ॥

॥ ६००४ ॥ काळतोंडा सुना । भलते चोरुनि करी जना ॥ १ ॥ धिग त्याचें साधुपण । विटाळुनि वर्ते मन ॥ २ ॥ मंत्र ऐसे घोकी । वश व्हावें जेणें लोकीं ॥ २ ॥ तुका म्हणे थीत । नागावला नव्हे हित ॥ ४ ॥

॥ ६००५ ॥ एका बोटाची निशाणी । परीपाक नाहीं मनीं ॥ १ ॥ तरि तें संपादिलें सोंग । कारणांवांचूनियां व्यंग ॥ २ ॥ वैष्णवांचा धर्म । जग विष्णु नेणे वर्म ॥ ३ ॥ अतिशयें पाप । तुका सत्य करी माप ॥ ४ ॥

॥ ६००६ ॥ तोचि लटिक्यामाजी भला । म्हणे देव म्यां देखिला ॥ १ ॥ ऐशियाच्या उपदेशें । भवबंधन कैसें नासे ॥२॥ बुडवी आपणास-रिसे अभिमानें आणिकांस ॥३॥ आणिक नाहीं जोडा । देव ह्मणवितां या मूढा ॥ ४ ॥ आणिकांचे न मनीं साचें । तुका म्हणे या श्रेष्ठाचें ॥ ५ ॥

॥ ६००७ ॥ आणितां सा गती । हंस काउळे न होती ॥ १ ॥ सांडा सांडारे मठारे । येथें गांठीसवें धुरें ॥ २ ॥ नाकेविण मोतीं । उभ्या बाजारें फजिती ॥ २ ॥ हुकुमदाज तुका । येथें कोणी फुंदों नका ॥ ४ ॥

॥ ६००८ ॥ उभ्या बाजारांत कथा । हे तों नावडे पंढरीनाथा ॥१ ॥ अवघे पोटासाठीं ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ २ ॥ लावी अनुसंधान । कांहीं देईल ह्मणऊन ॥ ३ ॥ काय केलें रांडलेका । तुला राजी नाहीं तुका ॥ ४ ॥

॥ ६००९ ॥ मोलें घातलें रडाया । नाहीं असुं आणि माया ॥ १ ॥ तैसा भक्तिवाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥ २ ॥ वेठी धरिल्या दावी

भाव । मागें पळायाचा पाव ॥ ३ ॥ काजव्याच्या ज्योती । तुका ह्मणे न लगे वाती ॥ ४ ॥

॥ ६०१० ॥ न मनीं ते ज्ञानी न मनीं ते पंडित । ऐसे परीचे एक-एका भावें ॥ १ ॥ धातू पोसोनियां आणिकां उपदेश । अंतरीं तो लेश प्रेम नाहीं ॥ २ ॥ न मनीं ते योगी न मनीं ते हरिदास । दर्शनें बहुवस बहुतां परीचीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तयां नमन बाह्यात्कारीं । आवडती परी चित्तशुद्धीचे ॥ ४ ॥

॥ ६०११ ॥ परद्रव्य परनारी । अभिळासूनि नाक धरी ॥१ ॥ जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥ २ ॥ सोंवळ्याची स्फीति । क्रोधें विटाळला चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सोंग । दावी बाहेरील रंग ॥ ४॥

॥ ६०१२ ॥ टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥ अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ॥२॥ मुद्रा लावितां कोरोनि। मान व्हावयासी जनीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ४ ॥

॥ ६०१३ ॥ ऐसे संत झाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ॥१॥ स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग वोडवली ॥ २ ॥ भांगभुर्का हें साधन । पची पडे मद्यपान ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघें सोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ ४ ॥

॥ ६०१४ ॥ जातीची शिंदळी । तिला कोण वंशावळी ॥ १ ॥ आपघर ना बापघर । चित्तीं मनीं व्यभिचार ॥ २ ॥ सेजे असोनियां धणी । परद्वार मना आणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे असल जाती । जातीसाठीं खाती माती ॥ ४ ॥

॥ ६०१५ ॥ अंधळयाची काठी । हिरोनियां कडा लोटी ॥ १ ॥ हें कां देखण्या उचित । लाभ किंवा कांहीं हित ॥ २ ॥ साकर ह्मणोनि माती । चाळवूनि द्यावी हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाटे । देवा पसरावे सराटे ॥ ४ ॥

॥ ६०१६ ॥ मुंगी होउनि साकर खावी । निजवस्तूची भेटी घ्यावी । ॥ १ ॥ वाळवंटीं साकर पडे । गज येउनि काय रडे ॥ २ ॥ झाला हरिदास गोसावी । अवघी मायिक क्रिया दावी ॥ ३ ॥ पाठ पाठांतरिक विद्या । जनरंजवणी संध्या ॥ ४ ॥ प्रेम नसतां अंगा आणी । दृढ भाव नाहीं मनीं ॥ ५ ॥ ब्रम्हज्ञान वाचे बोले । करणी पाहतां न निवती डोळे ॥ ६ ॥ मिथ्या भगल वाढविती । आपुली आपण पूजा घेती ॥ ७ ॥ तुका ह्मणे धाकुटें व्हावें । निजवस्तूसी मागुनि घ्यावें ॥ ८ ॥

॥ ६०१७ ॥ वर्तें करोनियां तोंड । हाका मारितो प्रचंड ॥ १ ॥ राग आळवितो नाना । गातो काय तें कळेना ॥ २ ॥ आशा धरोनि मनीं । कांहीं देईल ह्मणऊनि ॥ ३ ॥ पोटा एका साठीं । तुका ह्मणे झाले कष्टी ॥ ४ ॥

॥ ६०१८ ॥ एकाचिये सोई कवित्वाचे बांधे । बांधिलिया साधे काय तेथें ॥ १ ॥ काय हातीं लागे भुसांचे कांडणीं । रुत्यासी दाटणी करून काय ॥ २ ॥ कवित्वाचे रुढी पायां पाडी जग । सुखावोनि मग नरकान्मय ॥ ३ ॥ तुका म्हणे देव केल्याविण साह्य । फजिती ते आहे लटक्या अंगीं ॥ ४ ॥

॥ ६०१९ ॥ तरी कां बोळगणे । राजद्वारीं होती सुने ॥ १ ॥ अंगीं दावुनि निष्कामता । पोकळ पोकळी ते वृथा ॥ २ ॥ कासया मोकळ । भोंवतें शिष्यांचें गावाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे ढाळे । बाहेर गुदे तें निराळें ॥ ४ ॥

॥ ६०२० ॥ भजन या नासिलें हेंडि । दंभा लंडा आवडी ॥ १ ॥ जेवीतना आइता पाक । नासी ताक घुसळूनि ॥ २ ॥ एकाएकीं इच्छी पाठ । नेणे चाट कां जेवूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मुलाम्याचें । बंधन साचें सेवटीं ॥ ४ ॥

॥ ६०२१ ॥ ब्रह्मज्ञानाजी भरोवरी । पुढिला सांगे आपण न करी ॥ १ ॥ थू थू साच्या तोंडावरी । व्यर्थ सिणवी वैखरी ॥ २ ॥ कथा करी वरिवरि । प्रेम नसेचि अंतरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे कवित्व करि । मान वस्तु हे आदरी ॥ ४ ॥

॥ ६०२२ ॥ सुगरणी बाई थिता नास केला । गुळ तो घातला भाजी मध्यें ॥ १ ॥ क्षिरीमध्यें हिंग दुधा मध्यें बोळ । थितेंचि वोंगळ कैसें केलें ॥ २ ॥ दळण दळोनी भरूं गेली पाळी । भरडोनि वोंगळी नास केला ॥ ३ ॥ कापुराचें सांते आणिला लसण । वागवितां सीण दुःख होय ॥ ४ ॥ रत्नाचा जोहारी रत्नाचि पारखी । येर देखोदेखीं हातीं घेती ॥ ५ ॥ तुका ह्मणे जरी योग घडे निका । न घडतां थुंका तोंडावरि ॥ ६ ॥

॥ ६०२३ ॥ भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ॥ १ ॥ वाढवूनि जटा फिरे दाही दिशा । तरी जंबुवेषा सहज स्थिति ॥ २ ॥ कोरोनियां भूमी करिती मधीं वास । तरी उंदरास काय वाणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें कासया करावें । देहासी दंडावें वाउगेंचि ॥ ४ ॥

॥ ६०२४ ॥ न कळे ब्रह्मज्ञान आचार विचार । लटिका वेव्हार करी-तसे ॥ १ ॥ विश्वामित्री पोटीं तयाचा अवतार । नांव महाखर चांडाळाचें ॥ २ ॥ द्रव्य इच्छेसाठीं करीतो कथा । काय त्या पापिष्ठा न मिळे खाया ॥ ३ ॥ पोट पोसावया तोंडें बडबडी । नाहीं धडफुडी एक गोष्टी ॥ ४ ॥ तुका ह्मणे तया काय व्याली रांड । येऊनियां भांड जनामध्यें ॥ ५ ॥

॥ ६०२५ ॥ होऊनि संन्यासी भगवीं लुगडीं । वासना न सोडी विषयांची ॥ १ ॥ निंदिती कदान्न इच्छिती देवान्न । पाहताती मान आदराचा ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसें दांभिक भजन । तया जनार्दन भेटे केवीं ॥ ३ ॥

॥ ६०२६ ॥ ऐसे नाना भेष घेऊनी हिंडती । पोटासाटीं घेती प्रति-ग्रह ॥ १ ॥ परमार्थासी कोण त्यजी संवसार । सांगापा साचार नांव साचें ॥ २ ॥ जन्मतां संसार त्यजियेला शुकें । तोचि निष्कळंक तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ६०२७ ॥ मुखें सांगे ब्रह्मज्ञान । जन लोकाची कापितो मान ॥१॥ ज्ञान सांगतो जनासी । नाहीं अनुभव आपणासी ॥ २ ॥ कथा करितो दे-वाची । अंतरीं आशा बहु लोभाची ॥ ४ ॥ तुका ह्मणे तोचि वेडा । त्याचें हाणूनि थोबाड फोडा ॥ ४ ॥

॥ ६०२८ ॥ संतचिन्हें लेऊनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ॥ १ ॥ ॥ १ ॥ पाडिले दुःखाचे सागरीं । वहावले ते भवपुरीं ॥ २ ॥ कामक्रोधलो-भ चित्तीं । वरि वरि दाविती विरक्ती ॥ ३ ॥ आशापाशीं बांधोनि चित्त । म्हणती झालों आह्मी मुक्त ॥४॥ त्यांचे लागले संगती । झाली त्यांची तेचि गति ॥ ५ ॥ तुका ह्मणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें ॥ ६ ॥

॥ ६०२९ ॥ जगीं कीर्ति व्हावी । ह्मणोनि झालासी गोसावी ॥ १ ॥ बहु केलें पाठांतर । वर्म राहिलेसें दूर ॥ २ ॥ चित्तीं नाहीं अनुताप । ल-टिकें भगवें स्वरूप ॥ ३ ॥ तुका म्हणे शिंदळीच्या । व्यर्थ श्रमविली वाचा ॥ ४ ॥

॥ ६०३० ॥ इंद्रियांसीं नेम नाहीं । मुखीं राम ह्मणोनि कायी ॥ १ ॥ जेवीं मासीसंगें अन्न । सुख नेदी तें भोजन ॥ २ ॥ कीर्तन करावें । तैसें करूनी दावावें ॥ ३ ॥ हे तों अंगीं नाहीं चिन्हें । गाईलें वेश्येच्या ढव्यानें ॥ ४ ॥ तुका म्हणे रागा । संत शिवूं नेदिती अंगा ॥ ५ ॥

॥ ६०३१ ॥ घालुनियां मध्यवर्ती । दाटुनि उपदेश देती ॥ १ ॥ ऐसे पोटभरे संत । तया कैचा भगवंत ॥ २ ॥ रांडा पोरातें गोविती । वर्षासन ते लाविती ॥ ३ ॥ जसें बोलती निरोपणी । तैसी न करिती करणी ॥ ४ ॥ तुका ह्मणे तया । तमो गुणि त्यांची क्रिया ॥ ५ ॥

॥ ६०३२ ॥ भाग्यासाठीं गुरु केला । नाहीं आम्हांसी फळला ॥ १ ॥ याचा मंत्र पडतां कानीं । आमच्या पेवांत गेलें पाणी ॥ २ ॥ गुरु केला घरवासी । आमच्या चुकल्या गाई म्हसी ॥ ३ ॥ स्वामी आपुली बुटबुट घ्यावी । आमुची मताप टाकुन द्यावी ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसे नष्ट । त्यांची दुणे होती कष्ट ॥ ५ ॥

॥ ६०३३ ॥ विद्या अल्पपरी गर्व शिरोमणि । मजहूनी ज्ञानी कोण आहे ॥ १ ॥ अंगीं भरला ताठा कोणास मानीना । साधूची छळणा स्वयें करी ॥ २ ॥ साधूचे देहाचा मानी जो विटाळ । त्रिलोकीं चांडाळ तोचि एक ॥ ३ ॥ संतांची जो निंदा करितो या मुखें । खतेला सकळ पापें तोचि एक ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ५ ॥

॥ ६०३४ ॥ भोंदावया मीस घेऊनि संतांचें । करी कुटुंबाचें दास्य सदा ॥ १ ॥ मनुष्याचे परी बोल रावा करी । रंजवी नरनारी जगामध्यें ॥ २ ॥ तिमयाचा बैल करी सिकविलें । चित्रींचें बाहुलें गोष्टी सांगे ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा जळो हे महंती । लाज नाहीं चित्तीं निसुगातें ॥ ४ ॥

॥ ६०३५ ॥ अंगीं घेऊनियां वारें दया देती । तया भक्तां हातीं चोट आहे ॥ १ ॥ देव्हारा बैसोनि हालविती सुपें । ऐसीं पापी पापें लिंपताती ॥ २ ॥ एकीबेकीन्यायें होतसे प्रचित । तेणें लोक समस्त भुलताती ॥ ३ ॥ तयांचे स्वाधीन दैवतें असती । तरी कां मरती त्यांचीं पोरें ॥ ४ ॥ तुका ह्मणे पाणी अंगारा जयाचा । भक्त कान्होबाचा तोहि नव्हे ॥ ५ ॥

॥ ६०३६ ॥ ऐसे कैसे झाले भोंदु । कर्म करोनि ह्मणती साधु ॥ १ ॥ अंगा लावुनियां राख । डोळे झांकुनी करिती पाप ॥ २ ॥ दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगों किती । जळो तयाची संगती ॥ ४ ॥

॥ ६०३७ ॥ झालासी पंडित पुराण सांगसी । परि तूं नेणसी मी हें कोण ॥ १ ॥ गाढ्यभरी पोथ्या उलथिशी पानें । परि गुरुगम्यखुणे नेणशी बापा ॥ २ ॥ तुका कुणबियाचा नेणे शास्त्रमत । एक पंढरिनाथ विसंबेना ॥ ३ ॥

॥ ६०३८ ॥ कीर्त्तनाचा विकरा मातेचें गमन । भाड खाई धन विटाळ तो ॥ १ ॥ हरिभक्तांची माता हे हरिगुणकीर्त्ति । इजवर पोट भरिती चांडाळ ते ॥ २ ॥ अंत्यज हा ऐसें कल्पांतीं करीना । भाड हे खाईना जननीची ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचें दर्शन ही खोटें । पुर्वजांसि नेटें नरका धाडी ॥ ४ ॥

॥ ६०३९ ॥ जळोजळो तें गुरुपण । जळोजळो तें चेलेपण ॥ १ ॥ गुरु आला वेशीद्वारीं । शिष्य पळतो खिडोरीं ॥ २ ॥ काशासाठीं झालें येणें । त्याचें आलें वर्पासन ॥ ३ ॥ तुका म्हणे चेला । गुरु दोघे हि नरकाला ॥ ४ ॥

॥ ६०४० ॥ शिष्या सांगे उपदेश । गुरूपूजा हे विशेष ॥ १ ॥ दावी आचार सोंवळे । दंड कमंडलु माळे ॥ २ ॥ छाटी भगवी मानसीं । व्यर्थ ह्मणवी संन्यासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे लोभ । न सुटे नाहीं लाभ ॥ ४ ॥

॥ ६०४१ ॥ एक ह्मणती आह्मी देवचि पैं झालों । ऐसें नका बोलों पडाल पतनीं ॥ १ ॥ एक ह्मणती आह्मी देवाचीं पैं रूपें । तरी तुमाचिया वापें न चुके जन्म ॥ २ ॥ देवें उचलिली स्वकरें मेदिनी । तुमचेनीं गोणि नुचलवे ॥ ३ ॥ देवें मारियेलें दैत्य दानव मोठे । तुमचेनीं न तुटे तृणमात्र ॥ ४ ॥ रायाविठोबाचें पद जो अभिळापी । पातकाची राशी तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६०४२ ॥ म्हणवितां हरिदास कां रे नाहीं लाज । दीनास महाराज म्हणसी हीना ॥ १ ॥ काय ऐसें पोट न भरे तें गेलें । हालविसी कुले सभेमाजी ॥ २ ॥ तुका म्हणे पोटें केली विटंबना । दीन झाला जना कींव भाकी ॥ ३ ॥

॥ ६०४३ ॥ अडचणीचें दार । वाहेर माजी पैस फार ॥ १ ॥ काय करावें तें मौन्य । दाही दिशा हिंडे मन ॥ २ ॥ वाहेर दावी वेश । माजी वासनेचे लेश ॥ ३ ॥ नाहीं इंद्रियां दमन । काय मांडिला दुकान ॥ ४ ॥

सारविलें निकें । वरि माजी अवघें फिकें ॥ ५ ॥ तुका म्हणे अंतीं । कांहीं न लागोचि हातीं ॥ ६ ॥

॥ ६०४४ ॥ लटिक्याचे वाणी चवी ना सवाद । नाहीं कोणा वाद रुचों येत ॥ १ ॥ अन्याय तो त्याचा नव्हे वायचाळा । मायबापीं वेळा न साधिली ॥ २ ॥ अनावर अंगीं प्रबळ अवगुण । तांतडीनें मन लाहो साधी ॥ ३ ॥ तुका म्हणे दोष आणि आवकळा । न पडतां ताळा घडतसे ॥ ४ ॥

॥ ६०४५ ॥ दाढी डोई मुंडी मुंडुनियां सर्व । पांघुरती वरवें वस्त्र काळें ॥ १ ॥ उफराटी काठी घेउनियां हातीं । उपदेश देती सर्वत्रांसी ॥ २ ॥ चाळवुनी रांडा देउनियां भेष । तुका म्हणे त्यांस यम दंडी ॥ ३ ॥

॥ ६०४६ ॥ लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चाले ॥ १ ॥ खायाचा बोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा ॥ २ ॥ सेवी भांग अफू तमाखू उदंड ॥ परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥ ४ ॥

॥ ६०४७ ॥ जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥ १ ॥ बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ॥ २ ॥ तटावृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ॥ ३ ॥ तुका म्हणे द्रव्य घेती ॥ देती ते ही नरका जाति ॥ ४ ॥

॥ ६०४८ ॥ किती सोसिती करंटीं । नेणों संसाराची आटी ॥ १ ॥ पोटीं सर्वकाळ । चिंतेची हळहळ ॥ २ ॥ रिकामिया तोंडें राम । काय उच्चारितां श्रम ॥ ३ ॥ उफराटा श्रम । गोवी विषय माजिरा ॥ ४ ॥

॥ ६०४९ ॥ कळतां न कळे । उघडे झांकियेले डोळे ॥ १ ॥ भरलें साचे चाळे । अंगीं वारें मायेचें ॥ २ ॥ तुका ह्मणे जन । ऐसें नांव बुद्धिहीन ॥ ३ ॥ बहुरंगें भिन्न । एकीं एक निमालें ॥ ४ ॥

॥ ६०५० ॥ जाणे वर्तमान । परि ते न वारे त्याच्यानें ॥ १ ॥ तो ही कारणांचा दास । देव ह्मणवितां पावे नास ॥ २ ॥ वेची अनुष्ठान । सिद्धी कराया प्रसन्न ॥ ३ ॥ तुका ह्मणे साचें ॥ मुदल गेलें हाटवेचें ॥ ४ ॥

॥ ६०५१ ॥ आशाबद्ध बहु असे निलाजिरें । होय ह्मणें धीरें फळ टोंकें ॥ १ ॥ कारणापें चित्त न पाहें अपमान । चित्त समाधान लाभासा-

टीं ॥ २ ॥ तुका म्हणे होतें लोटिलें न कळे । झांकीतसे डोळे पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ६०५२ ॥ सांगों जाणती शकुन । भूत भविष्य वर्तमान ॥ १ ॥ सांचा आम्हांसी कंटाळा । पाहों नावडती डोळां ॥ २ ॥ रिद्धिसिद्धींचे साधक । वाचासिद्ध होती एक ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती । पुण्यक्षयें अधोगती ॥ ४ ॥

॥ ६०५३ ॥ दिली चाले वाचा । क्षय मागिलया तपाचा ॥ १ ॥ रिद्धिसिद्धि येती घरा । त्याचा करिती पसारा ॥ २ ॥ मानदंभासाठीं । पडे देवा सवें तुटी ॥ ३ ॥ तुका म्हणे मेवा । कैचा वेठीचिया निदेवा ॥ ४ ॥

॥ ६०५४ ॥ उष्ट्या पत्रावळी करुनियां गोळा । दाखविती कळा कवित्वाची ॥ १ ॥ ऐसे जे पातकी ते नरकीं पचती । जोंवरी भ्रमती चंद्र-सूर्य ॥ २ ॥ तुका म्हणे एका नारायणा ध्याई । वरकडा वाहीं शोक असें ॥ ३ ॥

॥ ६०५५ ॥ काळावरी सत्ता । ऐशा करितों वारता ॥ १ ॥ तो मी हीणाहूनि सांडें । देवा तुम्हें काळतोंडें ॥ २ ॥ मानूनी भरंवसा । होतों दासा मी ऐसा ॥ ३ ॥ तुका म्हणे मान । गेलों वाढवूं थोरपण ॥ ४ ॥

॥ ६०५६ ॥ शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाहीं कोणा ॥ १ ॥ पंडित हे ज्ञानी करितील कथा । न मिळती अर्था निजसुखा ॥ ॥ २ ॥ तुका म्हणे जैसी त्यांचासाठीं व्याधी । देतील हे नाहीं ठावी वस्तु ॥ ३ ॥

॥ ६०५७ ॥ पुण्यविकरा तें मातेचें गमन । भाडी ऐसें धन विटाळ तो ॥ १ ॥ आत्महत्यारा हा विषयांचा लोभी । म्हणावें तें नाभी करवी दंड ॥ २ ॥ नागवला अल्प लोभानिंय साठीं । घेऊनि कांचवटी परिस दिला ॥ ३ ॥ तुका म्हणे दान आदिले परत्रीं । श्रम तोचि श्रोत्रीं वेठी केली ॥ ४ ॥

॥ ६०५८ ॥ नायकावे कानीं नयाचे ते बोल । भक्तीविण फोल ज्ञान सांगे ॥ १ ॥ वखाणी अद्वैत भक्ति भावेंवीण । दुःख पावे शिण श्रोता वक्ता ॥ २ ॥ अहंब्रम्हवीण चाळवाशी तोंडा । न बोलावे भांडा तया सवें ॥ ३ ॥ देखं बहिर्लट करितां पाखंड । तुका म्हणे तोंड काळें त्याचें ॥ ४ ॥

॥ ६०५९॥ वाढवूनी जटा लावूनियां राख ॥ भोंदी जन लोक नाना
परी ॥ ध्यान धरूनियां आरण्यांत बैसे ॥ गळां घाली पाश मार्गस्थासी
॥ २॥ प्रातःकाळीं जपे रुद्राक्षाच्या माळा ॥ अंतरींच्या कळा शुद्ध नाहीं।
॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें जळो अंतःकरण ॥ करितां ताडन दोष नाहीं॥४॥

॥ ६०६० ॥ निजध्यास नाहीं जया स्वरूपासी । बहु बोले वाचेसी ठक
गोष्टी ॥ १ ॥ लोकांसी पाहून म्हणे राम राम । अंतरींचें वर्म खोटाईचें
॥ २ ॥ देखील्या वांचूनि सांगे रूप रेखा । त्यासी म्हणे तुका जगभोंदू ॥३॥

॥ ६०६१ ॥ गळां घालोनिया माळा । केला रामानंदी टिळा ॥ १ ॥
टाळ मृदूंगाचे घोळ । नित्य मांडिला गोंधळ ॥ २ ॥ परी नाहीं भक्ति
प्रेम । मनीं नाहीं सिताराम ॥ ३ ॥ तुका ह्मणे ढोंग केलें । संतपणे वांयां
गेलें ॥ ४ ॥

॥ ६०६२ ॥ एक म्हणती गुरु गुरु । भोंवती भार शिष्यांचा ॥ १ ॥
पुच्छ नाहीं पायीं चारी । मनुष्य परी कुतरें तें ॥ २ ॥ परनारी पयपान ।
पेंड खाणें माजविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे निर्भर चित्तीं । नर्का प्रति
जावया ॥ ४ ॥

॥ ६०६३ ॥ गोसावी झाला गुंडा । केला परमार्थाचा लुंडा ॥ १ ॥
बाइलेसी ह्मणे बाई । बोडी डोई खापराची ॥ २ ॥ तुका ह्मणे अच्युत ।
या गाढवा प्रायश्चित ॥ ३ ॥

॥ ६०६४ ॥ मुद्रा घाली कानीं । जन मानाया लागुनी ॥ १ ॥ टिळे
टोपी उंच दावी । मानाया लागुनी गोसावी ॥ २ ॥ स्नान विधि बुडवि-
ला । पुढें भोग ओढवला ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघें सोंग । तेथें कैंचा
पांडुरंग ॥ ४ ॥

॥ ६०६५ ॥ राजसाच्या सभे संगीताचें गाणें । तेथें ब्रह्मज्ञान काई
काज ॥ १ ॥ सार मंडण हातीं धरिली रुद्रविण । सांगा जन्ममरण चुके
कोणा ॥ २ ॥ तुका ह्मणे अवध्या जाणाव्या या चेष्टा । उगलेचि निष्ठा
धरितां भले ॥ ३ ॥

॥ ६०६६ ॥ जपाचें निमित्त झोपेचा पसरु । देहाचा विसरू पाहूनियां
॥ १ ॥ ऐसी तीं भजनें अमंगळवाणी । सोंगसंपादणी बहुरूप्याची ॥ २ ॥
सेवेसी विकिलें लोभाचिये आसे । तया कोठें असे उरला देव ॥ ३ ॥ तुका
ह्मणे मानदंभ जया चित्तीं । तयाची फजीती करूं आह्मी ॥ ४ ॥

॥ ६०६७ ॥ गाजराची पुंगी । तैसे नवे झाले जोगी ॥ १ ॥ काय करोनी पठन । केली अहंता जतन ॥ २ ॥ अल्प असे ज्ञान । अंगीं ताठा अभिमान ॥ ३ ॥ तुका ह्मणे लंड । त्याचें हाणोनि फोडा तोंड ॥ ४ ॥

॥ ६०६८ ॥ लांबवूनि जटा नेसोनि कासोटा । अभिमान मोठा करिताती ॥ १ ॥ सर्वांगा करिती विभूतिलेपन । पाहाती मिष्टान्न भक्षावया ॥ २ ॥ तुका ह्मणे साांचा नव्हे हा स्वधर्म । न कळतां वर्म मिथ्यावाद ॥३ ॥

॥ ६०६९ ॥ होउनी जंगम विभूती लाविती । शंख वाजविती घरोघरीं ॥ १ ॥ शिवाचें निर्माल्य तीर्था न सेविती । घंटा वाजविती पोटासाठीं ॥ २ ॥ तुका ह्मणे त्यासी नाहीं शिवभक्ति । व्यापार करिती संसाराचा ॥ ३ ॥

॥ ६०७० ॥ लावूनियां मुद्रा बांधोनियां कंठीं । हिंडे पोटासाठीं देशोदेशीं ॥ १ ॥ नेसोनि कोपीन शुभ्रवर्ण जाण । पाहती पक्वान्न क्षेत्रींचें तें ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥३॥

॥ ६०७१ ॥ गळां घालोनियां माळा । केला रामानंदी टिळा ॥ १ ॥ टाळ मृदंगाचे घोळ । नित्य मांडिला गोंधळ ॥ २ ॥ परी नाहीं भक्तिप्रेम । मनीं नाहीं सीताराम ॥ ३ ॥ तुका ह्मणे ढोंग केलें । संतपण वांयां गेलें॥४॥

॥ ६०७२ ॥ ऐकोनियां गोष्टी सांगे ब्रह्मज्ञान । गुरुकृपा खूण कांहीं नेणे ॥ १ ॥ ह्मणवितो संत मन नाहीं शांत । पोकळ आकांत भावाविण ॥ २ ॥ तयाचे संगती न तरेचि कोणी । भोळ्या भाविकांनीं सोडावें तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तरूं आपण नेणती । दुजियां तारिती असंबद्ध ॥ ४ ॥

॥ ६०७३ ॥ आंत भगवें झालें नाहीं । बाहेर भगवें करुनी कायी ॥ २ ॥ नाहीं वासना साधन । काय करूनी मुंडण ॥ २ ॥ आधीं करुनी साचा नाश । मग घेई कां सन्यास ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त निर्मळ । संन्यास घेतल्याचें फळ ॥ ४ ॥

॥ ६०७४ ॥ संसाराचा केला त्याग । मनींचा राग जाईना ॥ १ ॥ भजन तें ओंगळवाणें । नरका जाणें चुकेना ॥ २॥ अक्षरांची आटा आटी । निंदा पोटीं संताची ॥ ३ ॥ तुका म्हणे मागे पाय । तया जाय रसातळासी ॥ ४ ॥

॥ ६०७५ ॥ मेंढा मारुनी यज्ञ केला । म्हणे सोमयाग झाला ॥ १ ॥ भजन चालिलें उफराटें । कोण जाणे खरें खोटें ॥ २ ॥ सेंदूरें माखियेला

धोंडा । पायां पडती पोरें रांडा ॥ ३ ॥ अग्निहोत्रासी सुकाळ । वडा पिंपळाचा काळ ॥४॥ सजीवाची तोडा तोडी । निर्जीवा लाखोली रोकडी॥ ५॥ तुका म्हणे ऐशा रिती । काय विठ्ठल येईल हातीं ॥ ६ ॥

॥ ६०७६ ॥ आह्मी पवित्र आचारी । चोरोनियां भलतें करी ॥ १ ॥ जना दावी पवित्रता । अंतरीं तो असे रिता ॥ २ ॥ दावी वरी वरी सोंग । अंतरीचें दिसे व्यंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे करी देखी । माती पडो त्याचे मुखीं ॥ ४ ॥

॥ ६०७७ ॥ थोर संत ह्मणोनी पायां पाडी जन । गेलें संतपण नरकासी ॥ १ ॥ ढोंगियापें बापा कैंचा नारायण । भोंदियले जन दांभिकत्वें ॥ २ ॥ बोलतसे भांड आपुलें भुषण । कवडीसाठीं प्राण देऊं पाहे ॥ ३ ॥ तीळभरी पुण्य नाहीं त्या पदरीं । तेथें कैंचा हरी पाखांड्यापें ॥ ४ ॥ तुका ह्मणे त्यानें केली विटंबना । चौऱ्याशी यातना भोगावया ॥ ५ ॥

॥ ६०७८ ॥ दुर्जनाचे घरीं पुस्तकांचे भार । शब्दांचे व्यवहार ज्ञान सांगे ॥ १ ॥ नको नको कधीं तयाशीं संबंध । न भेटे गोविंद कदाकाळीं ॥ २ ॥ तुका म्हणे मुर्ख वागवी पुस्तक । दारोदारीं भीक मागावया ॥ ३ ॥

॥ ६०७९ ॥ स्वार्थ परमार्थ संपादीले दोन्ही । एकही निदानी नव्हे त्यासी ॥ १ ॥ दोहों पेवांवरी ठेवूं जाता हात । होय अपघात शरीराचा ॥ २ ॥ तुका ह्मणे त्यासी दोहींकडे धोका । सेवटीं नरका माजी पडे ॥ ३ ॥

॥ ६०८० ॥ नाहीं भक्ति सुख । झाला जाणिवेचा मुर्ख ॥ १ ॥ अंगीं जाणिवेची मस्ती । विद्यागर्वें होय स्तुती ॥ २ ॥ कधीं न मानी कोणासी । फुगे गर्वें मदराशी ॥ ३ ॥ तुका ह्मणे वैष्णवांनीं । वेगीं सोडावें थुंकोनी ॥ ४ ॥

॥ ६०८१ ॥ ऐसे वेषधारी जगांत हिंडती । नानापरी घेती प्रतीग्रह ॥ १ ॥ परमार्थसंगें त्यजिना संसार । आपण साचार भ्रष्ट होय ॥ २ ॥ काय भुललासि वरील रंगासी । काय जाब देसी यमसभे ॥ ३ ॥ तेथें कैंचा आप्त मान धन जन । सोडाविल कोण जन्ममृत्यु ॥४॥ जन्म संवसार त्यजियलें सुखें । तोचि निष्कलंक सूर्य जैसा ॥ ५ ॥ तुका ह्मणे ज्याचे मनीं नाहीं आस । बोलंगाति त्यास सर्व सिद्धी ॥ ६ ॥

॥ ६०८२ ॥ ऐशीं मैंदाचीं लक्षणें । भोंदिताति अवघे जन ॥ १ ॥ ह्मणे सारासार करा । गोविंदाची भक्ति धरा ॥ २ ॥ भोळे भाविक हे जन त्यांसी सांगतसे ज्ञान ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६०८३ ॥ ऐसा पतंगी जो रंग । त्यासी कैचा पांडुरंग ॥ १ ॥ कथा करी बाजारांत । ह्मणे जगीं आह्मी संत ॥ २ ॥ जन मूढ प्राणी । त्यांसी मंत्र सांगे कानीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६०८४ ॥ मखरा लाउनी वेगड । आंत मांडोनि दगड ॥ १ ॥ हातीं घेऊनियां टाळ । घाली बाचेचा गोंधळ ॥ २ ॥ काय केलें रांडपोरा । वर्म चुकलासी गव्हारा । तुका म्हणे खोटें । तुझें कपाळ करंटें ॥ ४ ॥

॥ ६०८५ ॥ देवा घरीं काय उणें । हिंडे दारोदारीं सुनें ॥ १ ॥ करी अक्षरां अटाटी । एका कवडीचिया साटीं ॥ २ ॥ एका निंदी एका स्तवी । सदा चिंतातूर जिवीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहे रांडे । काय पोरें व्यालिस भांडे ॥ ४ ॥

॥ ६०८६ ॥ शांती दाखवित भावें । कोणी आला त्यावरी धांवे ॥१॥ मनीं धरीत विरक्ती । परी काम पुढें उठती ॥२॥ नाहीं अंतरीं तो भाव । लोकां दावितसे देव ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६०८७ ॥ सोंग दावितसे लोकां । हरीरूपीं नाहीं निका ॥ १ ॥ त्याचे बोल नाइकावे । नाहीं अंतरीं तो देव ॥ २ ॥ सदा चित्त परद्वारीं । अघोर भोगीं निरंतरी ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६०८८ ॥ अमंगळ पापराशी । भाव दाखवी मानसीं ॥ १ ॥ मैंदपण धरी मनीं । विषयवासना भरूनी ॥ २ ॥ सदा करी अनाचार । दुःख भोगितो अपार ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६०८९ ॥ राम नाहीं हा वाचेसी । करी संकल्प मनासीं ॥ १ ॥ म्हणे वैकुंठासी जावें । प्रेम धरोनियां भावें ॥ २ ॥ नाहीं अंतरींचें ज्ञान । म्हणे जगीं आम्ही धन्य ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६०९० ॥ ऐसा अभागी जो नर । तोचि कुंभाराचा खर ॥ १ ॥ जन्मवरी कष्ट करी । नाहीं पुण्य तीळभरी ॥ २ ॥ थोरपण बोले संता । म्हणे मज म्हणा कर्ता ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६०९१ ॥ करी संतांची हेळणा । मिरवी आपुला थोरपणा ॥ १॥ ज्ञानी जाणिव ते कळा । मनीं भाव तो निराळा ॥ २ ॥ यासि नाहीं तो हा मार्ग । ह्मणे दावा पांडुरंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६०९२ ॥ श्रृंगारिला ज्ञानेविण । जैसा गाढवावरी जीन ॥ १ ॥ त्यासी उदंड खरारा । परी जातीचा गाढव खरा ॥ २ ॥ त्यासी अमृत पाजाल । दीर्घ गर्जना करील ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरभरे चारा । परी जातीचा गद्धा खरा ॥ ४ ॥

॥ ६०९३ ॥ संत होती महा भले । परी रांडांनीं नाशिले ॥ १ ॥ स्नान संध्या बुडविली । पुढें भांग ओढवली ॥ २ ॥ देवपुजेचा कंटाळा । हातीं मोंकळ्याचा चाळा ॥ ३ ॥ वैश्वदेवा आलात्रास । हुका पेटवी मायास ॥ ४ ॥ तुका ह्मणे अंतीं । जातोयमाचिये हातीं ॥ ५ ॥

॥ ६०९४ ॥ आणितातीं गती । हंस कावळे न होती ॥ १ ॥ नाकाविणें मोती । उभ्या बाजारीं फजिती ॥ २ ॥ शुद्ध नाहीं क्रिया । सर्व तेंही गेलें वांया ॥ ३ ॥ हुकुमदाज बोले तुका । प्रेमाविणें फुंदूं नका ॥ ४ ॥

॥ ६०९५ ॥ देव पुजेचा कंटाळा । हातीं गंजिफांचा चाळा ॥ १ ॥ गंध उगाळीतां कष्टी । आवडीनें भांग घोटी ॥ २ ॥ हरीकथे न जाय लंडी । दासीचीं तीं घरें धुंडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सारा । त्याचा यमलोकीं थारा ॥ ४ ॥

॥ ६०९६ ॥ न मनीं नाम न मनी त्यासी । वाचाळ शब्द पिटी भासी ॥ १ ॥ भाव नाहीं काय मुद्रा वाणी । बैसे वेगळा निश्चळ ध्यानीं ॥ २ ॥ नाहीं चाड देवाची कांहीं । छळणें ठाके तस्कर घाई ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचा संग । नको शब्द स्पर्शजग ॥ ४ ॥

॥ ६०९७ ॥ गोसावी असोनी संसाराची चिंता । लोकांसी सांगतां लाज नाहीं ॥ १ ॥ म्हणती उदास असावें संसारीं । आपण दारोदारीं

हिंडताती ॥ २ ॥ तुका ह्मणे तेणें गोसावी ह्मणविलें । आपणा वुडविले तपाविणें ॥ ३ ॥

॥ ६०९८ ॥ स्नानाविण करी शोभन तांतडी । चार ते धगडी करी- तसे ॥१॥ कुंथाचे ढेंकरें न देवेल पुष्टी । रूप दावी दृष्टी मलीन बरी ॥ २ ॥ तुका ह्मणे नको देखीचा दिमाक । मोडसीचें दुःख पोट फोडी ॥ ३ ॥

॥ ६०९९ ॥ बांधोनियां माज खांद्यावरी धन। काखेसी बांधोन पोथी हिंडे ॥ १ ॥ आधीं तो व्यापार करी आठवडा । अंत्यज निधडा सर्वे व्याजी ॥ २ ॥ जाउनी घरासी शिव्या मायलेंकीं । देतां घेती लेखी मांगिणीसी ॥ ३ ॥ होऊन ब्राम्हण ख्रिस्तीचा व्यापार । म्हारासी व्यवहार नित्य काळीं ॥४॥ एकमेका गाळी देतां उडे थुंका । संमार्जन मुखा होत तेणें ॥५॥ तुका ह्मणे आग लागो व्यासंगासी ॥ जाणें निर्यवासीं तया लागे ॥ ६ ॥

॥ ६१०० ॥ लौकिकीं मान्यता व्हावी द्रव्यकांता। बरवें बहुता मज ह्मणे ॥ १ ॥ काया शृंगारावी आचार जनांचा । तेथें विठोबाचा राहे कैसा ॥ २ ॥ टिळे माळा मुद्रा वैष्णव सोंवळा। दावी प्रेमकळा दांभिकांची ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं ज्यास शुद्ध भक्ति। चित्रींचे भासती शृंगारिक ॥ ४ ॥

॥ ६१०१ ॥ वरी सुरस बोल । कथाज्ञान माजी फोल ॥ १ ॥ ऐसे लटिके जे ठक । तयां इह ना परलोक ॥ २ ॥ परिसे एक सांगे । अंगा धुळी ही न लागे ॥ ३ ॥ तुका ह्मणे हाडें । कुतऱ्यां लाविले झगडे ॥ ४ ॥

॥ ६१०२ ॥ देखोदेखी व्रत करी । शुद्ध नाहीं सा अंतरीं ॥ १ ॥ वरीवरी दावी सोंगें । क्रोध उभा पुढें मागें ॥ २ ॥ लोकां सांगे आम्ही नीट । पोटीं बाधकेचा क्लिष्ट ॥ ३ ॥ तुका ह्मणे करी काय । लाभकैंचा वांया जाय ॥ ४ ॥

॥ ६१०३ ॥ वरी भाव दावित । जगालागिं तो भोंदीत ॥ १ ॥ द्रव्यवासना धरून । जगीं करीत कीर्तन ॥ २ ॥ भाव दावितसे लोकां । त्याचे बोल न आइका ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । त्याची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६१०४ ॥ भलतेंचि स्थापी जाण । ह्मणे वैराग्य हें ज्ञान ॥ १ ॥ सांगे ब्रह्म हतवटी । परब्रह्म नाहीं पोटीं ॥ २ ॥ ह्मणे दिव्य दृष्टी करा ।

मनीं विषयाचा थारा ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । त्याची भीड मला
नाहीं ॥ ४ ॥

॥ ६१०५ ॥ ह्मणे मीच एक कर्ता । मुखें करीत कविता ॥ १ ॥
नाहीं अंतरीं तो भाव । ह्मणे जगीं आह्मी देव ॥ २ ॥ ज्ञान ज्ञालेंसे
थोडेसें । ह्मणे जाणें ब्रम्हरस ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । त्याची भीड
मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६१०६ ॥ दोन अभंग शिकला । म्हणे जाणें त्या ब्रम्हाला ॥ १ ॥
संतां दाखवीत ज्ञान । कळा कुसरी करून ॥ २ ॥ बहु दाखवी लाघ-
व । अंतरीं निराळाचि भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । त्याची भीड
मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ६१०७ ॥ ऐसें नव्हे संतपण । शुद्ध करी अंतःकरण ॥ १ ॥
डोयी बुडोन केली खोडी । काया विटंबिली बापुडी ॥ २ ॥ पाय घा-
लुनी आडवा । काय जपतोसी गाढवा ॥ ३ ॥ मांजर करी एकादशी ।
उंदीर मारून भरल्या कुशी ॥ ४ ॥ उंटकरी प्रदक्षणा । लक्ष लावी पिंपळ-
पाना ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ६ ॥

॥ ६१०८ ॥ भक्ति नाशितसे हेडी । दंभा लंडी आवडी ॥ १ ॥
सिद्ध जेवितना पाक । नाशी ताक घुसळुनी ॥ २ ॥ एका एकीं इच्छी पाट
नेणे चाट कां जेवूं ॥ ३ ॥ तुका म्हणे मुलाम्याचें । बंधनाचे शेवटीं ॥ ४ ॥

॥ ६१०९ ॥ सांगे ज्ञानमार्ग । करी मांगिणीसी संग ॥ १ ॥
बहु अंतरींचा खोटा । पावे अपमान मोठा ॥ २ ॥ नाहीं यातींचा आ-
चार । घडे वाड्यांत व्यापार ॥ ३ ॥ तुका म्हणे भोगी नर्क । राहे
जोंवरीचंद्रार्क ॥ ४ ॥

॥ ६११० ॥ शिष्याहातीं जप । घोर पाप संचिलें ॥ १ ॥ द्रव्य मिळे
नाडी लोकां । जोडी थुंका साधिला ॥ २ ॥ शुद्धी नाहीं सांची रुका ।
पाप देखा नेणोंचि ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणे प्रांतीं । नर्कामती एकदां ॥ ४ ॥

॥ ६१११ ॥ समावे कारणें । नाहीं सोसत धरणें ॥ १ ॥ ळादी
थिंके ळाजिर्वाणी । हीन कमाईचें धाणी ॥ २ ॥ पुष्पापाशीं नाका । नांवें
दुर्गंधीच्या थुंका ॥ ३ ॥ तुका म्हणे किती । नाहीं उपदेश जाती ॥ ४ ॥

॥ ६११२ ॥ मैंदा बोली बरी असे । वाटे घालितसे फांसे ॥ १ ॥
दिसे कैं बरी चांग । नव्हे भोळी तेचि मांग ॥ २ ॥ पोटीं माळा कंठीं ।

घेपी अंधारीं ते धाटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तोचि पुंड । वरी वाजे यमदंड ॥ ४ ॥

॥ ६११३ ॥ शहाणा अत्यंत । जगीं मी एक पंडित ॥ १ ॥ म्हणे विठोबाचा दास । पाहे परस्त्रीची आस ॥ २ ॥ अंगीं नाहीं क्षमा दया । म्हणे भेट देवराया ॥ ३ ॥ तुका म्हणे सोंग । नाहीं त्यापाशीं श्रीरंग ॥४॥

॥ ६११४ ॥ ऐसें पाही तुज कांहीं । वेद नाहीं सांगाती ॥ १ ॥ दिव्य शृंगारिली काया । मागावया भिक्षेसी ॥ २ ॥ पर्वकाळीं साधी दान । मंत्रध्यान सोडिलें ॥३॥ घेऊं नये प्रतिग्रह । तैसें गृह लोभीष्ठ ॥ ४ ॥ दावी सोंग लोकांपुढें । लक्षी द्वाड द्रव्यासी ॥ ५ ॥ द्रव्य मिळे न ज्या दिसीं । पिशाऐशीं शरीरें ॥ ६ ॥ तुका तळमळी मन । जैसा श्वान पिसाट ॥ ७ ॥

॥ ६११५ ॥ टाळ घोळ गीत नृत्य। करी नित्य कामने ॥ १ ॥ नाहीं शंका मागे दान । थुंके जन त्या कर्मा ॥ २ ॥ टिळा टोपी कंठीं माळा । शोभे गळां मेखळा ॥ ३ ॥ नानावेषें सांगे गोष्टी । करी आटी द्रव्यासी । ॥ ४ ॥ तुका म्हणे हित पाही । नेणे कांहीं मी कोण ॥ ५ ॥

॥ ६११६ ॥ उदकीं पिशवी हालविती दाढी । माळे मणी ओढी निंदेचिया ॥ १ ॥ त्याचे फळपाकीं यमाचिये दंड । घर केलें कुंड कुंभपाकीं ॥ २ ॥ क्रोध पोटीं मांग आणिला अंतरा । भुकेनें कुतरा जपकरी ॥ ३ ॥ तुका म्हणे स्नान केलें मळमुत्र । जेवविले पित्र अमंगळ ॥ ४ ॥

॥ ६११७ ॥ काय लटिकाची खरा । सोंग दाखवी पसारा ॥ १ ॥ सर्व दिसतसे शिण । जरी बाग सोंग जाण ॥ २ ॥ बहुरूपी नट । लावी जनालागीं चट ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें सोंग । आम्ही जाणतसों ढोंग ॥ ४ ॥

॥ ६११८ ॥ टिळे माळा टोपी जपाचें स्मरण । लाविती करोन शुद्ध मुद्रा ॥ १ ॥ भगवीं वसनें निर्मळ प्रावर्णें । शुद्ध उपकर्णें धूत असे ॥ २ ॥ सोंवळ्याची स्फिति वागवी बहुत । जगासी आकांत दावी वरी ॥ ३ ॥ तुका म्हणे वरपंगीचें हें सोंग । भक्ति भावरंग तेथें कैंचा ॥ ४ ॥

॥ ६११९ ॥ करी दाटोनियां दोष । शिष्या देतो उपदेश ॥ १ ॥ नाहीं स्वहित तें ठावें । जना करी खोटे गोवे ॥ २ ॥ नाहीं ठावा पांडुरंग

दावी लटिकें तें सोंग ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढें दगा । आला न कळे हें जगा ॥ ४ ॥

॥ ६१२० ॥ मार्गीं बैसलासे मैंद । टिळे मुद्रा लावी शुद्ध ॥ १ ॥ नम्र बोलतसे वाचा । खोटा भाव अंतरींचा ॥ २ ॥ नेसे निरिया धोतर । जना दावी शिष्टाचार ॥ ३ ॥ येऊनि जवळी । दुष्ट कापितसे नळी ॥ ४ ॥ तुका म्हणे ते पातकी । जाणा विश्वासघातकी ॥ ५ ॥

॥ ६१२१ ॥ खोटें कर्म बळें करी । नाना प्रयत्नें निर्धारी ॥ १ ॥ काय म्हणावें तयाला । पापी पापासी लिंपला ॥ २ ॥ मैंद सुखीचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥ ३ ॥ काय लाधला तो दोषी । बळें जाय नरकासी ॥ ४ ॥ अभागिया खळा । जन्म नाहीं शुद्ध वेळा ॥ ५ ॥ तुका म्हणे जैसीं । फळें येती कर्में तैसीं ॥ ६ ॥

॥ ६१२२ ॥ आला सन्निध तो काळ । व्यर्थ वांयां जाते वेळ ॥१॥ काय निदसुरा जगा । उभा मैंद पुढें दगा ॥ २ ॥ माझें मीमी झोंबे शिरीं । नेणें ठाकूं कोणे परी ॥ ३ ॥ तुका म्हणे हेड । नेघे शिकविलें लंड ॥ ४ ॥

॥ ६१२३ ॥ द्रव्य घेउनीयां कथा जो करील । तरी तो जाईल अधोगती ॥ १ ॥ माझी कथा करा ऐसें म्हणे कोण । तरी नारायणा जिव्हा झडो ॥ २ ॥ साह्य तूं झालासी काय उणें आतां । इतर पैं भूतां काय मागों ॥३॥ तुका म्हणे सर्व सिद्धि तुझे पायीं । तूं माझा गोसावी पांडुरंग ॥४॥

॥ ६१२४ ॥ जाणे विरळा विरळा । पाप कळा सांगतां ॥ १ ॥ ह्मणे जाणोनीयां आम्ही । एके ब्रम्हीं मिळाले ॥ २ ॥ ठावें नाहीं क्रिया कर्म । कैसे श्रम यायाचे ॥ ३ ॥ तुका जेउनी तो धाला । तया आला गुणत्वें ॥ ४ ॥

॥ ६१२५ ॥ बहुरूपी नरें पालटिलें सोंग । अंतरींचा रंग जाणतसे ॥ १ ॥ तैसें भक्तजनीं न करावें ऐसें । परमार्थीं हांसें न होय तें ॥ २ ॥ टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदी जगीं फांसे कैसे ॥ ३ ॥ धिवर हा जैसा मास लावी गळीं । ओढोनियां नळी फाडीतसे ॥ ४ ॥ तुका म्हणे करी पराविया हाणी । पुढें पडे दुणी देणें लागे ॥ ५ ॥

॥ ६१२६ ॥ मैंद धरी सोंग स्त्रियेचा तो वेष । मार्गामध्यें बैसे वना माजि ॥ १ ॥ देखोनि पांथिक रडे म्हणे कैसें । भ्रतारानें असे मोकलिलें

॥ २ ॥ मज नाहीं कोणी मोकलिलें वनीं । फिरतसे ह्मणी काय करूं ॥ ३ ॥ मोहूनियां त्यासी सांगुनी दुःखास । चोरूनी दृष्टीस फांसा घाली ॥ ४ ॥ तुका म्हणे करी विश्वास जो घात । तया यमदूत जाचीतसे ॥ ५ ॥

॥ ६१२७ ॥ मैंदें संपादिला वैष्णवाचा वेष । हातींचा तो पाश गुप्त राखी ॥ १ ॥ भाविक कृपेचा फांसा घाली वाट । निर्दय तो नष्ट मारीतसे ॥ २ ॥ मुखींचा कोंवळा दावी वेष भला । अंतरीं भरला कुबुद्धीनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे पापी नाठवे आपणा । भोगील यातना अधोगती ॥ ४ ॥

॥ ६१२८ ॥ किती सांगावें हे नाइकती खळ । यमदूतीं गळ ठेविलासे ॥ १ ॥ नका नका धरूं घातक या चेष्टा । पुढें जाल कष्टा वरपडा ॥ २ ॥ डोळे झांकुनियां पातक सांचावें । दुष्ट मनी भावें कोण्या बळें ॥ ३ ॥ कोण राखे तुज कोण असे साह्य । विचारूनी पाहे स्त्रिया पुत्रां ॥ ४ ॥ कोण वेळ कैसी घडे अवचित । तेव्हां नाहीं होत साह्य कोणी ॥ ५ ॥ चित्त वित्त आप्त नये कोणी अंतीं । यमाची संगती होय जेव्हां ॥ ६ ॥ तुका ह्मणे दुरी नाहीं हें संनिध । आली जरा वृद्ध तेव्हां कळे ॥ ७ ॥

॥ ६१२९ ॥ वेष घेउनियां मैंद बैसे मार्गीं । दिसों नेदी जगीं कृतिमता ॥ १ ॥ कपाळासी हात लावोनियां बैसे । रडत आक्रोशें मार्गामध्यें ॥ २ ॥ माझिया भ्रतारें मोकलिलें वनीं । नाहीं मज कोणी मायबाप ॥ ३ ॥ जवळी जातांची फांस घाली गळां । नसे त्या चांडाळा दया कांहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे कोणी करी अपघात । कल्पवरी होत जाच तया ॥ ५ ॥

॥ ६१३० ॥ वेषधारी पोटासाठीं घेती छंद । विषरूपीं भेद विष होय ॥ १ ॥ परमार्थ दावी विषय लोभीक । पाप तें अनेक संचितसे ॥ २ ॥ तुका म्हणे मैंद करी अभिलाष । घडे निरयवास तात्काळिक ॥ ३ ॥

॥ ६१३१ ॥ लोकांलागीं सांगे करूं नका पाप । आपणासी झोंप लागलीसे ॥ १ ॥ लोकांसी सांगतो आपण हो भ्रष्ट । पुढें होती कष्ट जाचणीचे ॥ २ ॥ जाचील तो यम दया नाहीं त्यासी । काकुलती येसी मग कोणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देव आपुलासा करा । यमाचिया घरा जाऊं नका ॥ ४ ॥

॥ ६१३२ ॥ दाटुनीयां पाप करिती संचय । न कळतां सोय विधीमार्गीं ॥ १ ॥ न करावें तैसें करी आचरण । सांगतां ही नेणे होतो मु-

खें ॥ २ ॥ कर्म तैसा दंड बीज तैसें फळ । बोढवी कपाळ माझा होता ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाप भिईना जोडीतां । ठेवी भगवंता शब्द मुर्ख ॥ ४ ॥

॥ ६१३३ ॥ ऐसे वेषधारी जगांत हिंडती । नानापरी घेती प्रतिग्रह ॥ १ ॥ परमार्थ सांगे त्यजावा संसार । आपण साचार भ्रष्ट होय ॥ २ ॥ काय भुललासी वरील रंगासी । काय जाब देसी यमसभे ॥ ३ ॥ तेथें कैंचे अंतीं धनवान जन । सोडवील कोण जन्ममृत्यु ॥ ४ ॥ जन्म संवसार त्यजियलें सुख । तोचि निष्कलंक सूर्य जैसा ॥ ५ ॥ तुका ह्मणे ज्याचे मनीं नाहीं आस । वोळगती त्यास सर्व सिद्धी ॥ ६ ॥

॥ ६१३४ ॥ करुनियां स्नान संध्या देवार्चन । नित्य धर्म नेम जे जे कांहीं ॥ १ ॥ नेणे लाभ वेंच पदरींचा आदा । झाला भाग्यमंद नेणवेची ॥ २ ॥ परान्नासी दृष्टी चंचळ वृत्तीसी । नेणवे लाभासी हाणी आली ॥ ३ ॥ अंगुष्ठ धुवोनी देतां न लाजेची । पूजा इच्छी रुची आवडीनें ॥ ४ ॥ तुका ह्मणे गेलें नेणेचि जोडिलें । मजुराचें झालें जिणें ऐसें ॥ ५ ॥

॥ ६१३५ ॥ ऐसे कळीं झाले भोंदू । करिती कर्म ह्मणती साधु ॥ १ ॥ राख लावुनी अंगास । डोळे झांकी करी दोष ॥ २ ॥ दावी वैराग्याची कळा । भोगी विषयसोहळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगों किती जळो तयांची संगती ॥ ४ ॥

॥ ६१३६ ॥ काय सांगूं वाणी न पुरेची आतां । हित सांगूं जातां दुःख वाटे ॥ १ ॥ काय हे थोरीव मी एक संन्यासी । निंदावें लोकांसी मतांतरें ॥ २ ॥ जगाचिया चाली तुम्हासी कारण । राहिलें तें कोण सांगा ऐसें ॥ ३ ॥ आपुला आपण चालवावा पंथ । असेल जे रीत तैसें करा ॥ ४ ॥ तुका ह्मणे वेष घेतला संन्यासी । मागिल हे दासी काय काज ॥ ५ ॥

॥ ६१३७ ॥ लाविला लंगोटा नेसोनी कांसोटा । आश्रमाचा ताठा वागविती ॥ १ ॥ आम्ही ब्रम्हचारी हुंबरती गर्वें । अंतरीं हिरवें न शिजेचि ॥ २ ॥ चमकत चाले मोकळा कांसोटा । अभिमान मोठा वागविती ॥ ३ ॥ साजिरी गोजिरी दिसों लागे कांती । तुका ह्मणे नीति ऐसी नोहे ॥ ४ ॥

॥ ६१३८ ॥ ज्ञानीयांचा गर्व लवों नेदी कोणा । संताच्या पूजना नये चित्त ॥ १ ॥ ज्ञान सांगे लोकां आपण आंधळा । अज्ञानी वेगळा संगीं राहे ॥ २ ॥ तुका ह्मणे अल्प विद्या ज्ञानगंडे । म्हणोनीयां तोंड फोडा त्याचें ॥ ३ ॥

॥ ६१३९ ॥ काय लटिकाचि खरा । सोंग दाखवी पसारा ॥ १ ॥ सर्व दिसतसे शीण । जारी बाग सोंग जाण ॥ २ ॥ बहुरुपी नट । लावी जनालागीं चट ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें सोंग । आम्ही जाणतसों ढोंग ॥ ४ ॥

॥ ६१४० ॥ बहुरुपी नरें पालटिलें सोंग । अंतरींचा रंग जागतसे ॥ १ ॥ तैसें भक्तजनीं न करावें ऐसें । परमार्थी हांसें न होय तें ॥ २ ॥ टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदी जगीं फांस कैसे ॥ ३ ॥ ढिवर हा जैसा मांस लावी गळीं । ओढुनियां नळी फाडितसे ॥ ४ ॥ तुका ह्मणे करी पराविया हाणी । पुढें पडे दुणी देणें लागे ॥ ५ ॥

॥ ६१४१ ॥ आह्मी पुरणपोळीचे संत । कोण जाणे आमुचा अंत ॥ १ ॥ आह्मा तुपाची आवडी । न लगे ती चिंच कढी ॥ २ ॥ पान सुपारीचे सवें । गोड खाणें तेंच व्हावें ॥ ३ ॥ कांहीं काम तें करीना । घरीं कदान्न खाईना ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे संत । त्यांसी न भेटे भगवंत ॥ ५ ॥

॥ ६१४२ ॥ ब्रह्मज्ञान्याघरीं भक्तीचा दुष्काळ । शब्दांचा सुकाळ खटाटोप ॥ १ ॥ नाम नाहीं वाचे दया नाहीं पोटीं । तत्वाचिया गोष्टी प्रेमेंविण ॥ २ ॥ इंद्रियांसी जया नाहीं कोणे काळीं । म्हणती मृगजळीं कोण बुडे ॥ ३ ॥ तुका म्हणे हे तो अवघेचि सांग । वळविती जग पोटासाठीं ॥ ४ ॥

॥ ६१४३ ॥ देवें दिला देह भजना गोमटा । तो या लाभा भाटा बाधिकेच्या ॥ १ ॥ ताठोनियां मान राहिली वरती । अहंकार हातीं लवों नये ॥२॥ दास म्हणावया न वळे रसना । सैर ही वचना बागडला ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोठें ठेवावा विटाळ । स्नान तें निर्मळ व्हावयासी ॥ ४ ॥

॥ ६१४४ ॥ अपवित्र अनाचारी । खाय चोरुनी निर्धारी ॥ १ ॥ जना दावी पवीत्रता । असे अंतरींचा रिता ॥२॥ दावी वरी वरी सोंग । दिसे अंतरीं तें व्यंग ॥३॥ तुका ह्मणे करी देखी । माती पडे त्याचे मुखीं ॥ ४ ॥

॥ ६१४५ ॥ कवडीसाठीं फोडी शिर । काढुनी रुधिर मलंग तो ॥ १ ॥ पांघरती चर्म लोहाची सांकळी । मारिती आरोळी धैर्यबळें ॥ २ ॥ तुका ह्मणे त्यास नव्हती स्वधर्म । न कळतां वर्म गोविंदाचें ॥ ३ ॥

---

## ब्राह्मणास शिक्षा.

---

॥ ६१४६ ॥ महारासी सिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥ १ ॥ तया प्रायश्चित कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥ २ ॥ ना तळे चांडाळ । त्याचे अंतरीं विटाळ ॥ ३ ॥ ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो त्या याति ॥ ४ ॥

॥ ६१४७ ॥ तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोध तैसेचि खळ ॥ १ ॥ कां रे सिणलासि वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥ २ ॥ मानदंभासाठीं । केली अक्षराची आटी ॥ ३ ॥ तप करूनि तिर्थाटन । वाढविला अभिमान ॥ ४ ॥ वांटिलें तें धन । केली अंहता जतन ॥ ५ ॥ तुका म्हणे चुकलें वर्म । केला अवघाचि अधर्म ॥ ६ ॥

॥ ६१४८ ॥ हातीं होन दावी बेना । करिती लेंकीच्या धारणा ॥ १ ॥ ऐसे धर्म झाले कळीं । पुण्य रंक पाप बळी ॥ २ ॥ सांडिले आचार । द्विज चाहाड झाले चोर ॥ ३ ॥ टिळे लपविती पातडीं । लेती विजारा कातडीं ॥ ४ ॥ बैसोनियां तक्तां । अन्नेविण पिडिती लोकां ॥ ५ ॥ मुदबख लिहिणें । तेलतुपावरी जिणें ॥ ६ ॥ नीचाचे चाकर । चुकलिया खाती मार ॥ ७ ॥ राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुश्चितासि तोडी ॥ ८ ॥ वैश्यशूद्रादिक । हे तों सहज नीच लोक ॥ ९ ॥ अवघे बाह्य रंग । आंत हिरवे वरी सोंग ॥ १० ॥ तुका ह्मणे देवा । काय निद्रा केली धांवा ॥ ११ ॥

॥ ६१४९ ॥ काय दरा करील वन । समाधान नाहीं जंव ॥ १ ॥ तरी काय तेथें असती थोडीं । काय जोडी तयांसी ॥ २ ॥ रिघतां धांवा पेंवामध्यें । जोडे सिद्धि ते ठायीं ॥ ३ ॥ काय भस्म करील राख । अंतर पाप नाहीं तों ॥ ४ ॥ वर्णाआश्रमाचें वर्म । जाती श्रम झालिया ॥ ५ ॥ तुका ह्मणे सोंग पाश । निरसे आस तें हित ॥ ६ ॥

॥ ६१५० ॥ वेशा नाहीं बोल अवगुण दुषीले । ऐशा बोला भले ह्मणें शोभा ॥ १ ॥ कोण नेणे अन्न जीवाचें जीवन । विषमेळवण विष होय ॥ २ ॥ सोनें शुद्ध नेणे कोण हा विचार । डांकें हीनवर केलें त्यासी ॥ ३ ॥ याती शुद्ध परी अधम लक्षण । वांया गेलें तेणें सोंगेंही तें ॥ ४ ॥ तुका ह्मणे शूर तोचि पावे मान । आणीक मंडन भारवाही ॥ ५ ॥

॥ ६१५१ ॥ संध्या करितोसि केशवाच्या नांवें । आरंभीं ते ठावें नाहीं कैसें ॥ १ ॥ किती या सांगावे करूनि फजित । खळ नेणें हित जवळी तें ॥ २ ॥ माजल्या न कळे उचित तें काय । न घ्यावे तें खाय घ्यावें सांडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे घेती भिंतीसवें डोकें । वावसी तीं एकें अंधारलीं ॥ ४ ॥

॥ ६१५२ ॥ हुंदकी पिसवी हलवी दाढी । मणी ओढी निंदेचे ॥ १ ॥ त्याचें फळ पाकी यमाचे दंड । घर केलें कुंड कुंभपाक ॥ २ ॥ क्रोध पोटीं सांग आणिला अंतरा । भुंकोनि कुतरा जप करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्नान केलें मळमूत्रें । जेवविलीं पितरें अमंगळें ॥ ४ ॥

॥ ६१५३ ॥ अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ॥ १ ॥ वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळ याती ॥ २ ॥ ऐसा हा निवाडा झालासे पुराणीं ॥ नव्हे माझी वाणी पदरींची ॥ ३ ॥ तुका ह्मणे आगी लागो थोरपणा । दृष्टी त्या दुर्जना न पडो माझी ॥ ४ ॥

॥ ६१५४ ॥ पंडित म्हणतां थोर सुख । परि तो पाहतां अवघा मूर्ख ॥ १ ॥ काय करावें घोकिलें । वेदपठण वांयां गेलें ॥ २ ॥ वेदीं सांगितलें तें न करी । सम ब्रम्ह नेणे दुराचारी ॥ ३ ॥ तुका देखे जीवीं शिव । हाचि तेथींचा अनुभव ॥ ४ ॥

॥ ६१५५ ॥ धांई अंतरिंच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥ १ ॥ विधिनिषेध उर फोडी । जंव नाहीं अनुभवगोडी ॥ २ ॥ वाढे तळमळ उभयतां । नाहीं देखिलें अनुभवितां ॥ ३ ॥ आपुलया मतें पिसें । परि तें आहे जैसेंतैसें ॥ ४ ॥ साधनाची सिद्धि । मौन करा स्थिर बुद्धि ॥ ४ ॥ तुका ह्मणे वादें । वांयां गेलीं ब्रम्हवृंदें ॥ ५ ॥

॥ ६१५६ ॥ कुशळ गुंतले निषेधा । वादी प्रवर्तले वादा ॥ १ ॥ कैसीं ठकलीं बापुडीं । दंभविषयाचे सांकडीं ॥ २ ॥ भूस उपणुनि केलें

काय। हारपले दोन्ही ठाय ॥ ३ ॥ तुका ह्मणे लागे हातां । काम मथिलें घुसाळितां ॥ ४ ॥

॥ ६१५७ ॥ वेश वंदाया पुरते । कोण ब्राह्मण निरुते ॥ १ ॥ ऐसे सांगा मजपाशीं। संतां निरवितो येविशीं ॥ २ ॥ असा जी प्रवीण। ग्रंथीं कळे शुद्ध हीण ॥ २ ॥ तुका ह्मणे लोपें। सत्यचि या घडती पापें ॥ ४ ॥

॥ ६१५८ ॥ अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तिचा व्यापार। हिंडे घरोघर चांडाळांचे ॥ १ ॥ अंत्यजाची खिचडी घेताती मागून। गाळिया प्रदान मायबहिणी ॥ २ ॥ उत्तम कुळीं जन्म क्रिया अमंगळ। बुडविलें कुळ उभयतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसी कलियुगाची चाली। स्वार्थे बुडविलीं आचरणें ॥ ४ ॥

॥ ६१५९ ॥ पुराणीक ह्मणविती। जाणोनी कांदे भक्षिती ॥ १ ॥ अगस्तीचें मूत्र मळ। लावुनि म्हणती कृष्णावळ ॥ २ ॥ श्रेष्ठ वर्ण ब्राम्हणाचा। संग न सुटे शूद्रीचा ॥ ३ ॥ बदराहीच्या पाडी दाढा। लागे तुकयाचा हुंदाडा ॥ ४ ॥

॥ ६१६० ॥ खिस्तिचा उदीम ब्राम्हण कलयुगीं। महारवाडीं मांगीं हिंडतसे ॥ १ ॥ देवसाव करितां पर्वत मांगासी। ते पैं विटाळसी न मनिती ॥ २ ॥ मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा। तोंडावरि थुंका पडतसे ॥ ३ ॥ आशा माया रांडा नांव हें कागदीं। आठवीना कधीं नारायण ॥ ३ ॥ तुका ह्मणे देह झाला पराधीन। पांडुरंगाविण गति नाहीं ॥ ४ ॥

॥ ६१६१ ॥ जातीचा ब्राम्हण। न करितां संध्यास्नान ॥ १ ॥ तो एक नांवाचा ब्राम्हण। होय हीनाहूनि हीन ॥ २ ॥ सांडुनियां शाळिग्राम। नित्य वेश्येचा समागम ॥ ३ ॥ नेघे संतांचें जो तीर्थ। अखंड वेश्येचा जो अर्थ ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे पापी। पाहूं नका पुनरपि ॥ ५ ॥

॥ ६१६२ ॥ ब्राम्हण तो नव्हे ऐसी ज्याची बुद्धि। पाहा श्रुतीमधीं विचारूनी ॥ १ ॥ जयासी नावडे हरिनामकीर्तन। आणीक नर्तन वैष्णवांचें ॥ २ ॥ सत्य त्याचे वेळे घडला व्यभिचार। मातेसी वेव्हार अंत्यजाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें मानी आनसारिखें। तात्काळ तो मुखें कुष्ठ होय ॥ ४ ॥

॥ ६१६३ ॥ करिती ब्राम्हण खिस्तीचा व्यापार। सांडून आचार भ्रष्ट होती ॥ १ ॥ सांडी स्नानसंध्या स्वधर्म विचार। गायत्री उच्चार तेथें

चा ॥ २ ॥ नाहीं शुद्ध क्रिया धेंडानी पर्वत । आवडीनें निम्न कर्म करी ॥ ३ ॥ रांडामुंडा शिव्या आईमाई लेंका । परस्परें थुंका तोंडावरी ॥ ४ ॥ कवडीसाठीं तो प्राण देऊं पाहे । जाउनी राहे उभा द्वारीं ॥ ५ ॥ मांगिणीसी लेखा ब्राम्हणाकारणें । शुद्ध आचरणें बुडविलीं ॥ ६ ॥ तुका ह्मणे द्रव्य मेळविलें श्रमें । यमाजीचें धाम जोडी केली ॥ ७ ॥

॥ ६१६४ ॥ खिस्तीचा व्यापार करूनी आवडी । पूर्वजांसी धाडी अधोगती ॥ १ ॥ कायमा व्यवहार लोकांमाजी खोटा । न भरतां पोटा कांटे भरो ॥ २ ॥ अविंधाची सेवा अखंड लाधली । मनीं बोला बोली तेचि होय ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म आपुला सांडितां । जातो साचि पंथा नर्कामाजी ॥ ४ ॥

॥ ६१६५ ॥ सांडिला आचार । द्विज झाले चाहडखोर ॥ १ ॥ करूनी ईजारा व्यापार । प्रजा नागविती फार ॥ २ ॥ नीचाचे चाकर । चुकलिया खाती मार ॥ ३ ॥ वैश्य शुद्रादिक । हेतो सहजचि लोक ॥ ४ ॥ तुका ह्मणे श्रेष्ट । झाले लोक कर्मभ्रष्ट ॥ ५ ॥

॥ ६१६६ ॥ चित्त नाहीं हितावरी । धणी करी अपेक्षा ॥ १ ॥ तीर्थपर्वीं देतां सर्व । स्वयें भाव मनासी ॥ २ ॥ प्रतिग्रह या वचनें । घेतां दान न भिये ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेम नेणे । शुद्ध पुण्य हारवी ॥ ४ ॥

॥ ६१६७ ॥ सांडी सत्कर्म आचार । सदा हिंडे देशावर ॥ १ ॥ ऐसें पोटाचें पांगिलें । धन लोभिष्ट सांचिलें ॥ २ ॥ नाहीं आठव तिहींची । वाचा आर्वादि वेदांची ॥ ३ ॥ तुका ह्मणे जना मागे । दिलें नाहीं पांडुरंगें ॥ ४ ॥

॥ ६१६८ ॥ नामामारिखा आचार । कांहीं देखती साचार ॥ १ ॥ सर्व देहींचें हें ज्ञान । काय शिक्षा भागे जन ॥ २ ॥ अंगीं अभिमान वस्ती । बळगेंवें अंगीं मस्ती ॥ ३ ॥ तुका ह्मणे जातो नर्का । साच्या तोंडावरी थुंका ॥ ४ ॥

॥ ६१६९ ॥ अविद्या खाटकी निंद्य माहारी । हे तुम्हा अंतरीं नांदताहे ॥ १ ॥ काम तो चांभार क्रोध तोचि मांग । कासयानें चांग उंच तुम्ही ॥ २ ॥ बीज सामाऊनी मांजाहार रीती । काय ते फजीती सांगों आतां ॥ ३ ॥ दासीवेश्येघरीं तुमचें मैथुन । ह्मणविसां ब्राम्हण

लज्जा नये ॥ ४ ॥ इतकें बोलणें कासया लागतें । सोंवळे नसते जरी तुम्हा ॥ ५ ॥ बाबाजी सद्गुरू दास तुका म्हणे । कलियुगीं ब्राम्हण परिसावे ॥ ६ ॥

॥ ६१७० ॥ धन कवडी कवडी । ठेवी सांचून करंडी ॥ १ ॥ पाण्या न मिळे खावया । अंतीं सांडी सत्क्रिया ॥ २ ॥ अधम जातीचा । करी व्यापार खिस्तीचा ॥ ३ ॥ तुका म्हणे रांडलेका । पडे जन्मोजन्मीं नर्का ॥ ४ ॥

॥ ६१७१ ॥ नव्हे तो एकाचा । लेंक बहुतां बापांचा ॥ १ ॥ दासी राखिती ब्राम्हण । त्यांसी बाप दोघे जण ॥ २ ॥ परयोनींत पडतां बिंदु । तेथें पातकांचा सिंधु ॥ ३ ॥ त्याचा आचार पापराशी । तया नाहीं हृषीकेशी ॥ ४ ॥ धर्मदान केल्या त्याचे । वेष धनीया नराचे ॥ ५ ॥ पांडुरंग ह्मणे त्याला । काय पुजोनी विमाला ॥ ६ ॥

॥ ६१७२ ॥ मनीं धरोनियां ताठा । त्यासी चळ झाला फांटा ॥ १ ॥ वायां विण पुढें द्वाड । नर सुख इच्छी भांड ॥ २ ॥ ग्वाहीविण स्थापी मात । बळें आपुलें सतत ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे किती । नर्का गेले अधोगती ॥ ४ ॥

॥ ६१७३ ॥ सांगतों मी तरी नायकती बटकीचे ॥ पुढें शिंदळीचे रडतील ॥ १ ॥ नको नको तुह्मी भिऊं या रांडेस । पुढें यमफांस पडतील ॥ २ ॥ तुका ह्मणे जेव्हां ब्रम्हीं नाहीं चाड ॥ हाणुनी थोबाड यम फोडी ॥ ३ ॥

---

## शाक्तांस शिक्षा.

॥ ६१७४ ॥ कर्मीं न धरिती शंका । जाय नर्का आनंदें ॥ १ ॥ शक्तिपूजा चौक माळा । त्या रांगोळ्या विचित्रें ॥ २ ॥ पुजा कलशादि हारी । पात्रें वरीं ठेविलीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे दीप पुढां । पोरें रांडा मेळवी ॥ ४ ॥

॥ ६१७५ ॥ एके ठायीं करी काळा । नाहीं भ्याला वेदासी ॥ १ ॥ नाहीं भीड लाज संता ॥ लोलिंगता आवडी ॥ २ ॥ देवी देव रात्रीं पुजी ॥ आशा माजी द्रव्याची ॥ ३ ॥ तुका म्हणे शाक्त साचे ॥ खाती मोचे यमाचे ॥ ४ ॥

॥ ६१७६ ॥ अंगीं आणोनी महंती ॥ द्रव्यपुजेसी मागती ॥ १ ॥ जिच्या नांवें भोग धन ॥ तिचें नाहीं अभिधान ॥ २ ॥ जिची वाणी-जगीं कीर्ति ॥ नाहीं भेटी तिची भिती ॥ ३ ॥ तुका म्हणे थोर ॥ नाहीं जोडला आधार ॥ ४ ॥

॥ ६१७७ ॥ शक्ति पुजितसे रांड ॥ मुळी भांड मांगीण ॥ १ ॥ कंकु लावी कपाळासी ॥ सुशोभेसी शोभत ॥ २ ॥ यंत्र पुजी रांड लेकां ॥ भुली लोकां कौतुकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगों किती ॥ नर्की जाती सायासें ॥ ४ ॥

॥ ६१७८ ॥ चौक रांगोळीया साधी । रांडमांदी भोंवती ॥ १ ॥ एक मेकां नाहीं चवी । करी गोंवी विषयीं ॥ २ ॥ नाहीं शुद्धवरी पाय । पापें जाय नर्कासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐशा जना । यातना सा यमाची ॥ ४ ॥

॥ ६१७९ ॥ वांकडीच मान वांकडी पगडी । मद्यपी आवडी पाप दृष्टी ॥ १ ॥ तोंडें बडबडी नाहीं शुद्ध बुद्धी । वर्ते नाना छंदीं नेणे कांहीं ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसें करितांचि आधीं । पडले समुद्रीं काळाचिया ॥ ३ ॥

॥ ६१८० ॥ रांगोळीया चौक माळा । शिष्य मेळा मेळवी ॥ १ ॥ यंत्र पुजा घट मांडी । साधे जोडी अधर्म ॥ २ ॥ आगमांचें ह्मणे ज्ञान । मागे धन पुजेसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पडे रिता । खोटा धिता आपण ॥ ४ ॥

॥ ६१८१ ॥ एक करी शक्तिपूजा । यंत्र वोजा अवर्ण ॥ १ ॥ काय त्याचें थोरपण । ठायीं अन्नपान तें ॥ २ ॥ मद्यपात्र मुखीं जाण । अपोषण बुडाले ॥ ३ ॥ तुका सांडुनी आचार । अनाचारें वर्तती ॥ ४ ॥

॥ ६१८२ ॥ नेणे आपुलिया हित । नेणे शाक्त मांजर ॥ १ ॥ मद्य पितां माजे रेडा । तैशा पाडा दिसत ॥ २ ॥ देहभाव नाहीं शुद्धि । भली बुद्धि भ्रंशिली ॥ ३ ॥ तुका ह्मणे भ्रांत वेडा । तैशा जाडा चाळवे ॥ ४ ॥

॥ ६१८३ ॥ अंगीं लावूनी विभूती । चौक शक्ति अर्चिली ॥ १ ॥ घट मांडियले यंत्रीं । माळा सुत्रीं लोंबती ॥ २ ॥ गंध धूप दीप फुलें । परीमळ सुगंध ॥ ३ ॥ दीपपरी चहुं कोनीं । गुरुध्यानीं बैसती ॥ ४ ॥ शिष्या सांगे उपदेश । पुजेस तें दिव्यान्न ॥ ५ ॥ पात्रमुखीं मागे पुजा । दिव्य वोजा आणवी ॥ ६ ॥ तुका ह्मणे गधडीचे । शाक्त बुचे वर्तती ॥ ७ ॥

॥ ६१८४ ॥ नाहीं वेदांची मर्यादा । वर्ते अनाचार सदा ॥ १ ॥ काय ह्मणावें तयासी । मूर्तीमंत पापराशी ॥ २ ॥ नाहीं द्यावया उपमा । दुजा पापी झाली सीमा ॥ ३ ॥ तुका ह्मणे शाक्त । बेटा भोगी अधःपात ॥ ४ ॥

॥ ६१८५ ॥ जातां तयाचिया गांवा । गुण तयाऐसा व्हावा ॥ १ ॥ देखे शाक्ताचें जो कर्म । सांडी धर्म पडे भ्रम ॥ २ ॥ नेणे शुची स्नानसंध्या । वादी प्रवर्तक भेदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे संग । संगें नर्का जाणें लागे ॥ ४ ॥

॥ ६१८६ ॥ पर उपकारा साठीं । शक्ती वेंची बुडे सृष्टी ॥ १ ॥ सदा आठोडी पदरीं । पूजा आत्मा कृष्ण हरी ॥ २ ॥ पार नाहीं भाग्य ऐसें । पुण्यलाभ नाहीं ऐसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे सोपी । वाट अंतीं सुखरूपी ॥ ४ ॥

॥ ६१८७ ॥ दया तया नांव । दंभ क्रोध मारी जीव ॥ १ ॥ देवा पायीं सर्व शक्ति । दुणी वाढवावी प्रीति ॥ २ ॥ दाविलिया वाट । दिलें खाय जाय नीट ॥ ३ ॥ दाता ऐशा नांव । तुका ह्मणे वेंची जीव ॥ ४ ॥

॥ ६१८८ ॥ जगा सुख करी । जाणे साधु तो श्रीहरी ॥ १ ॥ जगामाजि राहे सदा । करी विरहित धंदा ॥ २ ॥ जन्मले भूतळीं । दीप उजळीला कुळीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे दाता । भुक्ति मुक्तीचा जानिता ॥ ४ ॥

॥ ६१८९ ॥ सांगतों या लोकां रांडा पूजूं नका । वैकुंठनायका भजा वेगीं ॥ १ ॥ काय असे चंडी शक्तीचिये हातीं । अधःपाता नेती अंतकाळीं ॥ २ ॥ म्हणोनीयां भाव धरा पांडुरंगीं । भवसिंधू वेगीं पार पावी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्याच्या नामें हे पतीत । पावले त्वरित वैकुंठासी ॥ ४ ॥

॥ ६१९० ॥ टंवकारूनी दृष्टि लावूनियां रंग । दावी झगमग डोळयापुढें ॥ १ ॥ ह्मणती शिष्यासी लागली समाधि । लटकीचि उपाधि झकविती ॥ २ ॥ दीपाचिया ज्योति कोंडियेलें तेज । उपदेश सांज रात्रीमाजी ॥ ३ ॥ रांगोळिया चौक शृंगारूनी वोजा । आवरण पूजा यंत्र करी ॥ ४ ॥ पडदा लावोनियां दीप चहूं कोनीं । बैसोनी आसनीं मुद्रा दावी